# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
## दिनांक १२.०४.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ११/०४/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ९,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ११/०४/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ११ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १९,०१०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. ११/०४/२०२४ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०६ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण २२,९४०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरुध विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगाणाया विरुध दि. ११/०४/२०२४ रोजी पोस्टे हिंगोली शहर व औंढा ना. अशा एकुण ०२ ठिकाणी कलम ४/२५ भारतीय कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.

**अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत गुटखा विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत दि. ११/०४/२०२४ रोजी पोस्टे गोरेगाव केंद्रा येथील महेश किराणा दुकान आरोपीचे दुकानात उत्तरेस १० किमी. नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा स्वताचे फायदया करीता अवैधरित्या वरील वर्णनाचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेल्या गुटख्याचा मुददेमाल मिळुन आला म्हणुन गुन्हा.